ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
*January - June 2021- Vol. 10 No. 1*

# भारतीय उच्च शिक्षणा समोरील आव्हाने

**प्रा. बाळासाहेब विठ्ठलराव तौर**
सहाय्यक प्राध्यापक आणि विभाग प्रमुख समाजशास्त्र विभाग,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंकुशनगर, ता. अंबड, जि. जालना

★★★

**गोषवारा**— ब्रिटिशांपासून आपण साहेबी परंपरा स्वीकारली आणि सोयीस्कररित्या ती जोपासली. गल्लोगल्ली आणि घरोघरी साहेब निर्माण झाले. पोषाखी पंडित यांचीही त्यातभर पडली. प्रत्यक्ष काम अथवा श्रम करणे म्हणजे कमीपणा, हे त्या परंपरेचे सूत्र. खरे तरी त्याचे मूळ केवळ इंग्रजांच्या वर्चस्वाच्या परंपरेत आहे असे म्हणणे ही तितके बरोबर नाही. ब्रिटिशपूर्व काळात ही आपल्या देशातल्या तथाकथित पंडितांनी आणि धर्ममार्तडांनी बुद्धी आणि श्रम यांची फारकत केली. त्या आधी भारतात श्रमाला प्रतिष्ठा होती. विद्वान व कारागिर यांच्या मध्ये संपर्क होता. विज्ञान व कला यांची जोपासना होत होती. ताम्रपाशाण युगाच्या प्रगतीची पूर्वपीठिका होती आणि त्यानंतर ही पोलाद उत्पादनाची प्रक्रिया व त्या संबंधीचे षोध, जस्त शुद्ध करण्याची पद्धत, दशांश पद्धत, शून्याची कल्पना, हस्तकला व हस्त कौशल्य या नानाविध बाबतीत भारतात प्रगती झाली होती. कापड विणण्याची कला विलोभनीयरित्या विकास पावली होती. इतकेच नाही तर पुरातन काळात रोगनिदान उपचार याबाबतीतही शास्त्र विकसित झाल्याचे आपणास वाचावयास मिळते.

वरील स्थितीत समाज एक प्रकारे एकसंघ होता तथापि समाजाच्या सुस्थितीचे हे पर्व लवकर संपले. तथाकथित धर्ममार्तडांनी विव्दानाची व समाज धुरिणांची जागा घेतली. त्यांना अहंकार निर्माण झाला. केवळ पुरातन कल्पना, परंपरा व तथाकथित ज्ञान यांची जोपासना करण्याची संकुचित कल्पनाच ते उराशी बाळगून बसले. समुद्र पर्यटनावर त्यांनी बंदी घातली. त्यामुळे जगाचा संपर्क तुटला. जातीपातीच्या उतरंडी रचनेची नसती उठाठेव शूद्रांना शिक्षणाचे दरवाजे बंद करणारी ठरली. स्त्रियांनाही क्षेत्राप्रमाणेच तुच्छ लेखले. दोघांचीही गणना त्यांनी जनावरांच्या बरोबरीने केली. शूद्र व स्त्री यांच्या दास्याची वाटचाल पुढे चालत राहिली. कोणत्या जातीने काय काम करावे, याच्या चर्वितचर्वणात हे धर्ममार्तड दंग झाले. परकीय गुलामगिरी चीड यांच्यात निर्माण झाली नाही. विज्ञान युगाच्या काळात या महाभागांना जाग आली नाही. धर्म आणि विज्ञान हे भिन्न आहेत, असे गॅलिलियो युरोपमध्ये सांगत होता. पण या धर्ममार्तडांच्या ते गावीही नव्हते, इतकेच नव्हे तर त्यानी त्याचा छळ केला. येथेही ज्ञानेष्वर आणि तुकाराम यांचा छळ झाला. हा खरा प्रत्यक्ष ज्ञानाचा छळ होताच पण जातीपातीच्या उच्चनीचतेच्या विशारी विकृतीची ही ही जोपासणा होती. कर्मठ धर्ममार्तडाच्या उण्मत सत्तेचा समाजावर पगडा बसला होता. या परंपरेच्या पगड्यातून आजही आपली शिक्षण पद्धती पूर्णपणे मुक्त झालेली नाही. स्त्रिया, दलित, आदिवासी, भटके विमुक्त व इतरही गरीब श्रमजीवी आजही शिक्षणापासून वंचितच आहेत. ज्ञान–विज्ञानाची त्यांची गाठ पडायला अजूनही किती पिड्या जातील हा संशोधनाचा विषय ठरेल. त्यातच ग्रामीण आणि शहरी, धनाडे आणि निर्धन अशा विभागणीची दरी शिक्षण क्षेत्रात अधिकच रुंदावत आहे. स्वातंर्त्यानंतर पन्नास वर्षाचा काळ जाऊन आमच्या शिक्षणाची ही अवस्था. पण त्याबाबत फारशी खंत आम्हाला नाही हा मोठा धक्कादायक दैवदुर्विलास आहे. म्हणूनच प्रस्तुत, "भारतीय उच्च शिक्षणासमोरील आव्हाने" या संशोधन लेखांमध्ये भारतातीय उच्च शिक्षणव्यवस्थे समोरील आव्हाने या अध्ययन विशयाच्या अनुशगाने उच्च शिक्षणाची संकल्पना समजून घेऊण, उच्चशिक्षणाची वर्तमान स्थिती व भारतीय उच्च शिक्षणाचा समोरील आव्हानाचे या बाबीवर चिंतन करण्यात आले आहे.

**मुख्यशब्द — भारतातीय, उच्च शिक्षण, आव्हाने.**

**प्रस्तावना** — मानवी जीवन व शिक्षण यांचा संबंध अत्यंत घनिष्ट आहे. शिक्षण हे मानवी विकासाचे सर्वात महत्वाचे साधन आहे. शिक्षणाद्वारे विकास व विकासाद्वारे शिक्षण. या समिश्र प्रक्रियेतून मानवी जीवनाचा प्रवास पुढे जात असतो. शिक्षणामुळे मानवी जीवनामध्ये उत्क्रांती घडून आलेले आहे. शिक्षणामुळे रूढी, प्रथा, परंपरा, अस्पृष्यता, गुलामगिरी या समस्या संपुष्टात येऊन प्रत्येक व्यक्तीला आत्मसन्मानाने जगता येते आणि कुटुंब समाज व देशाचा विकास होतो. शिक्षण आणि विकास अनन्य प्रक्रिया आहे. शिक्षणामुळे व्यक्तींच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांचा सर्वोच्य आविष्कार होतो. शिक्षण हे केवळ जीवनाला आकार देत नाही तर जीवनातील समस्यांची सोडवणूक देखील करते. शिक्षणामुळे मानवाचे नवीन विचार प्रगल्भ होतात. मानवी जीवनावर सुसंस्कार करून ते अधिक सहेतुक सुखी व समृद्ध बनविणे हा शिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. उदान्त विचाराने वागणारी चांगली माणसे तयार करणे हा शिक्षणाचा खरा उद्देश प्लेटो या तत्त्ववेत्त्यांनी सांगितला. मानवी जीवनात नैतिकतेला अनन्य साधारण महत्व आहे. चारिर्त्याविणा शिक्षण याला महात्मा गांधीनी सामाजिक पापांच्या जंत्रीत समाविष्ट केले आहे. चारिर्त्य आणि शील जोपसनारे शिक्षण आवश्यक आहे. नीतिमान समाज त्यातून निर्माण झाला पाहिजे. नीतिमान समाज, नीतिमान शिक्षण तज्ञ, शास्त्रज्ञ, प्राध्यापक, शिक्षक आणि तशाच नीतिमत्तेच्या वारसा घेतलेले विद्यार्थी हीच जगातील स्पर्धेला सामोरे जाण्याचे महत्वाची शक्ती, शक्तिस्थाने भविष्यात असतील परंतु भारतीय शिक्षण पद्धतीचा विचार करता ती

परंपरेच्या पगड्यातुन आजही पूर्णपणे मुक्त झालेली दिसत नाही. १९९१ मध्ये भारतात जागतिकीकरणाला सुरुवात झाली. १९९५ मध्ये स्थापना झाल्यानंतर गॅट्स कराराअंतर्गत डंकेल प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर भारताची शिक्षण व्यवस्था ही जागतिक उदारीकरणाच्या धोरणामुळे जागतिक बाजारासाठी खुली करण्यात आली. मुक्त आर्थिक धोरणानुसार शिक्षण क्रयवस्तू ठरले. शिक्षणावरील खर्च अनुत्पादक समजला गेल्यामुळे शिक्षणावरील खर्चात कपात करण्यात आली. स्वातंर्त्यानंतर भारताने स्वीकारलेल्या कल्याणकारी योजनेला व भारतीय संविधानातील कलम २९ (1) Right to Education मूलभूत अधिकाराला मूठमाती देणारी शैक्षणिक धोरणे स्वीकारली जात आहेत. संविधानातील १४, १५, १६ व १७ या कलमांना बाजूला सारून, शिक्षणाचे खाजगीकरण करून शैक्षणिक भेदभावाला सुरुवात झाली. शिक्षणाच्या खाजगीकरणे आर्थिकदृष्ट्या मागास समाजाला शिक्षणापासुन दूर लोटल्याने त्यांचे उच्च शिक्षणातील प्रमाण कमी होत आहे. जागतिक स्तरावरील एलपीजी चा परिणाम भारतीय शिक्षण व्यवस्थेवर झाला आहे आणि त्यामुळे आज शिक्षण क्षेत्रात अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. आज अनेक षैक्षणिक आव्हाने भारतीय शिक्षणव्यवस्था समोर उभी टाकली आहेत. म्हणून प्रस्तुत, "भारतीय उच्च शिक्षणा समोरील आव्हाने" या संषोधन लेखांमध्ये उच्चषिक्षणाची संकल्पना समजून घेऊन, भारतातील उच्च शिक्षणाची सद्यस्थिती व उच्च शिक्षणात समोरील आव्हानाचे विष्लेशण करण्यात आले आहे.

**अध्ययन विषयाचे उद्दिष्ट**

1. उच्च शिक्षणाची संकल्पना समजून घेणे.
2. उच्च शिक्षणाची वर्तमान स्थिती अभ्यासणे.
3. भारतीय उच्च शिक्षणासमोरील आव्हाने अभ्यासणे.

**अध्ययन विशयाचे महत्व** – शिक्षण हे मानवी विकासाचे सर्वात महत्वाचे साधन आहे. शिक्षणाद्वारे विकास व विकासाद्वारे शिक्षण. या समिश्र प्रक्रियेतून मानवी जीवनाचा प्रवास पुढे जात असतो. शिक्षणामुळे मानवी जीवनामध्ये उत्क्रांती घडून आलेले आहे. शिक्षणामुळे रूढी, प्रथा, परंपरा, अस्पृष्यता, गुलामगिरी या समस्या संपुष्टात येऊन प्रत्येक व्यक्तीला आत्मसन्मानाने जगता येते आणि कुटुंब समाज व देशाचा विकास होतो. शिक्षणामुळे व्यक्तींच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांचा सर्वोच्य आविष्कार होतो. मानवी जीवनावर सुसंस्कार करून ते अधिक सहेतुक सुखी व समृद्ध बनविणे हा शिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. भारताची शिक्षण व्यवस्था ही जागतिक उदारीकरणाच्या धोरणामुळे जागतिक बाजारासाठी खुली करण्यात आली. मुक्त आर्थिक धोरणानुसार षिक्षण क्रयवस्तू ठरले. षिक्षणावरील खर्च अनुत्पादक समजला गेल्यामुळे शिक्षणावरील खर्चात कपात करण्यात आली. शिक्षणाचे खाजगीकरण करून शैक्षणिक भेदभावाला सुरुवात झाली. जागतिक स्तरावरील एलपीजी चा परिणाम भारतीय शिक्षण व्यवस्थेवर झाला आहे आणि त्यामुळे आज अनेक शैक्षणिक आव्हाने भारतीय शिक्षणव्यवस्था समोर उभी टाकली आहेत, "भारतीय उच्च शिक्षणा समोरील आव्हाने" या संशोधन लेखांमध्ये उच्चशिक्षणाची संकल्पना समजून घेऊन, भारतातील उच्च शिक्षणाची सद्यस्थिती व उच्च शिक्षणात समोरील आव्हानाचे विश्लेषण करण्यात आले आहे. म्हणून प्रस्तुत अध्ययनाला खूप महत्त्व आहे.

**संशोधन पद्धती** – प्रस्तुत ''समकालीन भारतातील आदिवासी समाजाच्या समस्या आणि उपाय'' या अध्ययनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग केला असून. सदरील विषयाच्या संदर्भातील तथ्य संकलनासाठी दुय्यम स्त्रोतांचा उपयोग केला आहे. त्यामध्ये अनेक संदर्भग्रंथ, नियतकालिके, मासिके, पाक्षिके, संकेतस्थळे, वर्तमानपत्रे तसेच शासकीय व निमशासकीय संस्थाचे अहवाल इत्यादीचा उपयोग करून अध्ययन विशयाशी संबंधित तथ्याचे संकलन करण्यात आले आहे.

**शिक्षणाची संकल्पना** – प्रस्तुत संशोधन हे भारतातील उच्च शिक्षणा समोरील आव्हानाच्या संदर्भात असले तरी येथे त्या अनुशंगाने उच्च शिक्षणाची संकल्पना समजून घेणे आवशयक आहे. म्हणून उच्च शिक्षण कशाला म्हणायचे याचादेखील थोडक्यात आढावा घेणे या ठिकाणी क्रमप्राप्त ठरते. उच्च शिक्षण कशाला म्हणायचे अमुक एक अभ्यासक्रम उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात बसतो की नाही, ते कसे ठरवायचे हा वादाचा विषय होऊ शकतो. "इंटरनॅशनल स्टॅंडर्ड क्लासिफिकेशन ऑफ एज्युकेशन" या पुस्तकात म्हटले आहे की, १२ वर्षे उत्तम पायाभूत शिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थी विशेष जे शिक्षण घेतो त्याला उच्च शिक्षण म्हणतात. या पुस्तकात उच्च शिक्षणाच्या तीन पातळ्या दर्शविल्या आहेत. काही विशिष्ट व्यवसायांना अनुलक्षून अभ्यासक्रम उदाहरणार्थ परिचारक किंवा शिक्षक होण्यासाठीची अहर्ता देणारा अभ्यासक्रम पहिल्या पातळीत येतात, त्यांच्या वरच्या पातळीवर ज्या अभ्यासक्रमातून पदवी मिळते असे अभ्यासक्रम दुसर्‍या पातळीत येतात आणि तिसरी पातळीही पदव्युत्तर व संशोधनपर अभ्यासक्रमाची असते. उच्च शिक्षणाचा अर्थ स्पष्ट करताना असे म्हणता येईल की, "भावी जीवनात आवश्यक असणारे ज्ञान, क्षमता, आरोग्य, उपजीविकेचे साधन, समायोजन करण्याचे सामर्थ्य, गुण व कौशल्य या सर्वांची जोपासना करणे म्हणजे उच्च शिक्षण होय".

**भारतातील उच्च शिक्षणाची स्थिती** – भारताला स्वातंर्त्य प्राप्त झाले तेव्हा देशात केवळ २० विद्यापीठे, ५०० महाविद्यालये आणि त्यात केवळ १.२ लाख विद्यार्थी होते. आज मात्र देशातील विद्यापीठांची संख्या ४० टक्क्यांनी, महाविद्यालयांची संख्या ८० टक्क्यांनी व विद्यार्थ्यांची संख्या १२७ टक्क्यांनी वाढली आहे. हे मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या २०१५ च्या वार्षिक अहवालानुसार मार्च २०१५ पर्यंत देशात विद्यापीठांची संख्या ७११ व महाविद्यालयांची संख्या ४०७६० इतकी आहे. राज्यनिहाय विद्यापीठांची संख्या लक्षात घेतली तर असे निदर्शनास येते की राजस्थान राज्यात सर्वात जास्त म्हणजे ६८ विद्यापीठ आहेत. त्या खालोखाल उत्तर प्रदेश ६४ आणि तमिळनाडू ५२ विद्यापीठे आहेत. याचा अर्थ देशातील विविध राज्यात विद्यापीठाचे

असमान वितरण झालेले आढळून येते. शैक्षणिक सत्र २०१४–१५ मध्ये सर्व अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांचे एकूण नामांकन २६५.८५ लाख होते. ज्यामध्ये १२४.७६ लाख विद्यार्थिनी होत्या. विद्यार्थिनींचे नामांकनाचे हे प्रमाण ४६.९३ टक्के इतकी होते. उत्तर प्रदेश मध्ये विद्यार्थ्यांचे नामांकन सर्वात जास्त ४३.९७ लाख होते. त्यानंतर महाराष्ट्र २८.६० लाख, तमिळनाडू २४.१ लाख आणि राजस्थानमध्ये १६.२४ लाख इतके होते. देशातील विद्यापीठे आणि महाविद्यालयातील शिक्षकांची संख्या २०१३–१४ मध्ये १०.४९ लाख होती ती २०१४–१५ मध्ये १२.६१ लाख इतकी झाली आहे या १२.६१ लाख शिक्षकांपैकी ८४.६६ टक्के शिक्षक महाविद्यालयात आणि बाकीचे १५.३४ टक्के शिक्षक विद्यापीठात होते. वर्ष २०१४–१५ मध्ये २२८४९ पीएच. डी पदव्या प्रदान करण्यात आल्या. यामध्ये सर्वात जास्त कला शाखेत ७४८० पीएच. डी पदव्या देण्यात आल्या त्यानंतर विज्ञान शाखेत ७०१८ पीएच. डी पदव्या प्रदान करण्यात आल्या. या दोन्ही शाखेतील एचडी पदव्यांचे एकूण प्रमाण ६३.४५ टक्के इतके होते.

**भारतीय उच्च शिक्षणासमोरील आव्हाने** – १९९१ नंतर स्वीकारलेल्या नव्या आर्थिक धोरणांचा स्वीकार केल्यामुळे शिक्षण क्षेत्रावरील जबाबदारी वाढली. शिक्षण क्षेत्रात बरेच बदल अपेक्षित होते परंतु आपण जुन्या नैसर्गिक व मानवी संसाधन साधना सह २१ व्या शतकात उभे आहोत. तोच तोच जुना अभ्यासक्रम, शिक्षकांची उदासीनता, जुन्या इमारती, जुने ग्रंथालय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाप्रतीच्या आवडीचा अभाव (कारण रोजगारांची हमी नाही), प्राथमिक सोयी, सुविधांचा अभाव यामुळे शिक्षण संस्था आणि एकूणच शिक्षण व्यवस्थेत एक प्रकारचा ठराविक साचलेपणा आला आहे. या शिक्षण व्यवस्थेमुळे विद्यार्थी केवळ परीक्षार्थी झाला आहे. ज्ञानार्थी नाही. त्याला केवळ पदवी हवी आहे जेणेकरून पदवीच्या आधारे नोकरी मिळेल पण आता नोकरीची हमी सुद्धा राहिली नाही. या सर्व प्रकारामुळे शिक्षण क्षेत्राला मरगळ आलेली आहे. ती दूर करणे आवश्यक आहे. हा साचलेपणा काढून शिक्षण क्षेत्राला गतिमान करण्याची गरज आहे.

**2. संशोधनाचा दर्जा** – आज आपल्या देशातील विद्यापीठात मोठ्या प्रमाणात संशोधन होत आहे. परंतु या संशोधनाचा गुणात्मक दर्जा हा अतिशय खालावलेला आहे. विद्यापीठ शिक्षण आयोगाने महाविद्यालयीन आणि विद्यापीठातील शिक्षकांना संशोधनासाठी प्रोत्साहन दिले आहे. विशेष म्हणजे संशोधनास अधिक चालना मिळावी म्हणून पीएच.डी करणाऱ्या शिक्षकांना जास्तीचे इन्क्रिमेंट दिले जाते. त्यामुळे अनेक प्राध्यापक पीएच.डी चे संशोधन करतात. परंतु त्यांच्या पीएच. डी संशोधनाचा दर्जा अतिशय निकृष्ट असतो. विषेशता समाजविज्ञान, कला इत्यादी क्षेत्रातील संशोधनाचा दर्जा खूपच निकृष्ट आहे. त्याकरिता संशोधनास प्रोत्साहन देणे, त्याची गुणवत्ता वाढविणे हा नवीन शैक्षणिक जीवनातील एक महत्त्वाचा मुद्दा आहे.

आपल्या देशातील संशोधनाचा दर्जा हा अतिशय निम्न आहे. ही बाब विद्यापीठ आयोगाने देखील मान्य केली आहे. या संदर्भात सखोल चिंतन केल्यानंतर असे निदर्शनास येते की, विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव आहे. शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा निर्माण होऊन, तो प्रत्येक गोष्टीचा संदर्भात प्रश्न उपस्थित करून त्याचे उत्तर किंवा कारण शोधण्याचा प्रयत्न तो करतो. शिक्षणाचा उद्देश हा सत्याचा शोध घेणे हा आहे. पाश्चात्य देशांमध्ये तेथील विद्यार्थी असो किंवा शिक्षक असून त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टी आहे. त्यामुळे पाष्चात्य देषातील महाविद्यालये आणि विद्यापीठ आतून मोठ्या प्रमाणात मूलभूत संषोधन कार्य होते. नवनवीन विषयासंदर्भात ते संशोधन करून अनेक शोध लावतात. परंतु आपल्या देशात वैज्ञानिक दृष्टीच नाही. त्यामुळे संषोधनाचा दर्जा एक भारतीय उच्च शिक्षणाच्या समोर महत्त्वाचे आव्हान असल्याचे आढळुन येते.

**3. शिक्षणाचे खाजगीकरण आणि गुणवत्तेचा प्रश्न** पाष्चात्य देशातील चारशे विद्यापीठ भारतात येण्यास उत्सुक आहेत. या विद्यापीठांना हव्या असलेल्या सुविधा पुरविण्याची जबाबदारी शासनाने घेतली आहे. या विद्यापीठांचे अभ्यासक्रम कोणत्या देशाच्या विकासाच्या अनुशंगाने तयार करण्यात आलेला आहे? दर्जेदार उच्च शिक्षण या विद्यापीठात मिळेल का? या विदेशी विद्यापीठांच्या तुलनेत भारतीय विद्यापीठे तग धरू शकतील का? या विदेशी विद्यापीठांची शैक्षणिक गुणवत्ता कोण तपासणार? भारताच्या शिक्षण क्षेत्र विदेशी विद्यापीठांसाठी खुले केल्यानंतर असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. हे विदेशी विद्यापीठ भरमसाठ शिक्षण शुल्क आकारणार अशा विद्यापीठातून पैसे देऊन श्रीमंतांची मुले प्रवेश घेतील व गरीब पण हुशार विद्यार्थी या विदेशी विद्यापीठातील शिक्षणापासून वंचित राहतील.

१९९१ नंतर भारताने स्वीकारलेल्या खाजगी करणाच्या धोरणाचा परिणाम शिक्षण क्षेत्रावरही झाला. शिक्षण ही क्रयवस्तू ठरली. शिक्षण शुल्क आकारण्याचा अधिकार शिक्षण संस्थांना दिला. शिक्षण संस्थांनी भरमसाठ शुल्क आकारले. त्याचा परिणाम गरीब विद्यार्थ्यांवर झाला. पैशा अभावी ते उच्च शिक्षण घेऊ शकत नसल्याने त्यांचे आयुश्य अंधकारमय झाले आहे. श्रीमंतांची मुले मात्र जास्त पैसे देऊन शिक्षण घेतील बुद्धिहीन उच्चशिक्षिताचा एक नवा वर्ग तयार होईल. म्हणून आजच्या भारतीय उच्च शिक्षण समोरील आव्हानाचा जर आपण विचार केला तर शिक्षणाचे खाजगीकरण आणि गुणवत्तेची समस्या हे एक मोठे आव्हान असल्याचे आपल्याला दिसून येते.

**4. संगणक साक्षरता व तंत्रज्ञानाचा अभाव** – २१ व्या 'krdkrhy Social Transformation च्या युगात Communication Computer मजूवता आणि Knowledge अत्यावश्यक आहे. अलीकडे डिजिटल हा शब्द अनेक ठिकाणी अनेकदा ऐकायला मिळतो. परंतु भारताला डिजिटल इंडिया बनविण्यासाठी आपण तयार आहोत का ? वरील चारही बाबीसाठी भारताला बरीच पावले उचलणे गरजेचे आहे. भारतात कम्प्युटर साक्षरता केवळ ६.१५ टक्के आहे. ५ जी नेटवर्कचे जाळे भारतभर पसरले नाही, यावर विशेष लक्ष द्यावे लागेल. कारण उत्तर आधुनिक काळात संगणक साक्षरता, तंत्रज्ञान साक्षरतेवरून

जगाची विभागणी दोन वर्गात होत आहे. तंत्रज्ञान ज्यांच्याकडे तो देश प्रगती करेल त्यांचे वर्चस्व जगावर राहील. तांत्रिक प्रगती करणे ही काळाची गरज आहे हे ओळखून भारतात डिजिटल लिटरसी मिशन राबविणे आवश्यक आहे.

**5. सार्वजनिक–खाजगी भागीदारी** – अलीकडे Public Private Participation च्या संकल्पनेबाबत बोलले जाते. ही संकल्पना १९९४ मध्ये चीनने राबविली. उच्च शिक्षण संस्थातील स्थानिक लोकांचा सहभाग वाढला. भांडवलदार आपला बाजारभिमुख अभ्यासक्रम संस्थांना देतात. त्या संस्था Lowost Program Course तयार करून देतात व विद्यार्थी तसे तयार केले जातात. विद्यार्थ्यांना बाजारभिमुख अभ्यासक्रमात शिक्षण घेतल्या मुळे रोजगार सहज उपलब्ध होतो. बेकारीचा प्रश्न मिटतो. परंतु भारतात मात्र हे चित्र उलट आहे. येथे खाजगी क्षेत्राचे उद्दिष्ट निव्वळ नफा कमावणे हे आहे. शिक्षण क्षेत्राचे चाव्या सरकार समारंभपूर्वक खाजगी क्षेत्राच्या हातात देत आह. या खाजगी क्षेत्राला उच्च शिक्षणाची काही देणेघेणे नाही. शिवाय जनता सुद्धा आपली जबाबदारी सरकारवर टाकून मोकळे होत आहे. त्यामुळे ची संकल्पना भारतात मूळ धरू शकली नाही. हे देखील भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेची समोरील महत्त्वाचे आव्हान आहे.

**6. शिक्षणाचे भगवीकरण** – भारतात काही फुटीरतावादी शक्ती आहेत. त्या देषात अशांतता व अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. भारताने लोकशाहीचा अवलंब केल्यानंतर सर्व भारतीयांना स्वातंर्त्याचा अधिकार प्राप्त झाला. घटनेच्या माध्यमातून धर्मनिरपेक्षता पाळण्याची हमी भारताच्या लोकांना दिली. परंतु अलीकडे एक विशिष्ट प्रभावी विचारधारेचे लोक मात्र देशात अस्थिरता आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. घटनेने प्रदान केलेल्या स्वातंर्त्यावर गदा आणत आहे. त्याचा फटका शिक्षण क्षेत्रालाही बसत आहे. विध्वंसक षक्ती देशात घातक क्रुत्ते करून उच्च शिक्षणापासून बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना मागे खेचण्याचा प्रयत्न करीत आहेत. खरेतर धर्म आणि शिक्षण ही दोन्ही क्षेत्रे वेगवेगळे आहेत परंतु शिक्षण क्षेत्रात धर्माला घुसवून अलीकडे जे वादळ निर्माण करण्यात येत आहे त्याचा परिणाम मागास जातीच्या विद्यार्थ्यांना भोगावा लागत आहे. जात, धर्म, विचारधाराच्या आधारावर होणारा धुडगूस देशाची प्रतिमा मलिन करीत आहे. विशिष्ट एका धर्माची धार्मिक मुले अभ्यासक्रमात टाकण्यात आली आहेत. या शिक्षणातील भगव्याकरणाचे देखील भारतीय उच्च शिक्षण समोर फार मोठे आव्हान असल्याचे दिसून येते.

**निष्कर्श आणि सारांश** – २१ व्या शतकात जग विज्ञान – तंत्रज्ञानाने समृद्ध होऊन सर्व क्षेत्रात प्रगती करत आहे. भारत देखील त्या दृष्टीने प्रयत्नशील आहे. भारतात युवा मनुष्यबळ सर्वाधिक आहे. त्या मनुष्य बळाला शिक्षित आणि प्रशिक्षित केल्यास डॉक्टर अब्दुल कलाम यांच्या स्वप्नातील भारत लवकरच आर्थिक महासत्ता होईल. विज्ञान तंत्रज्ञानाच्या आधारे आर्थिक विकास साधताना बौद्धिक विकासावर भर देणे आवष्यक आहे. परंतु त्या दृश्टीने भारतात पुरेषा शैक्षणिक सुविधा उपलब्ध नाहीत. सरकारने स्वीकारलेल्या शैक्षणिक धोरणामुळे उच्च शिक्षण क्षेत्रावर आरिष्ट येत आहेत. त्यामधून मार्ग काढावा लागेल, शिक्षणाची गुणवत्ता वाढवावी लागेल, शिक्षणावरील खर्च वाढ करावी लागेल, शिक्षणाच्या खाजगीकरणावर अंकुष घालावा लागेल, बहुजनांच्या शैक्षणिक विकासाकडे लक्ष द्यावे लागेल, जागतिक बदलांचा विचार करीत भारतातील परिस्थिती लक्षात घेऊन उच्च शिक्षणासंदर्भात नियोजन करावे लागेल.

**संदर्भसूची**

1. *शिंदे रावसाहेब, (२०१०), "शिक्षण आणि समाज", अमेय प्रकाशन,पुणे.*
2. *वाघमारे जनार्धन, (२०१२), "लोकशाही आणि शिक्षण", पद्मगंधा प्रकाशन, पुणे.*
3. *भगत रा. तू. आणि कुलकर्णी विशंभर, (२००८), "पाश्चात्य शिक्षणातील विचारवंत", चौतन्य प्रकाशन, कोल्हापूर.*
4. *समाजशास्त्र सशोधन पत्रिका, (मार्च दृ २०१६), विशेशांक, भारतातील उच्च शिक्षण प्रश्न आणि आव्हाने, मराठी समाजशास्त्र परिशनेचे मुखपत्र, अंक–२०वा.*
5. *दुखाने अरविंद आणि देशपांडे लिला, (२००७), "प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र", नित्य नूतन प्रकाशन, पुणे.*
6. *दवेदी सीमा, (२००८), "वर्तमान शिक्षा नीति स्वरूप येऊ संभावनाए", साहित्य नीलम प्रकाशन, कानपूर.*
7. *शेख फारुख (संपादित), (२०१३), "आर्थिक विकास एक चिंतन", चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.*
8. *कापरे आनिता आणि भुते स्नेहल, (ऑक्टोंबर–डिसेंबर–२०१६), "अक्षरवेल", परिवर्तन प्रशिक्षण केंद्र, पुणे, त्रिमासिक, अंक–०३रा.*
9. *समाजशास्त्र सषोधन पत्रिका, (मार्च दृ २०१५), विशेषांक, शिक्षण आणि समाज, मराठी समाजशास्त्र परिषनेचे मुखपत्र, अंक–१९वा.*